# डॉ. नितीन मोरे



# ‘इका’गाईच्या कविता



# 'इका'गाई च्या कविता

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# 'इका'गाई च्या कविता

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# 'इका'गाई च्या कविता

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ ऑक्टोबर २०२१ (दसरा शके १९४३ )

©esahity Pratishthan®2021

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत: आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बत्तिसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

*“आम्ही कोण?” म्हणून काय पुसता दाताड वेंगाडुनी!*

*- केशवकुमार*

# 'इका'गाई च्या कविता

डॉ. नितीन मोरे

# प्रस्तावना

१.

## 'इका'गाई च्या कविता!

*इकिगाई म्हणून काही जपानी संकल्पना आहे म्हणे. ज्याची त्याची इकिगाई .. म्हणजे आयुष्याबद्दलची कल्पना .. असे काहीतरी आहे, म्हणजे असावे. इतका गहन विचार करण्याची सवय मला नाही. त्यामुळे कोणी असली इकिगाई वगैरे फिलॉसॉफी शिकवायला लागले की मी आपला गाई गाई करायला लागतो.. डोळे पेंगुळतात. जांभया यायला लागतात.. थोडक्यात काय.. आपले काही खरे नाही, हेच खरे! फिलॉसॉफी के बिना जीना भी कोई जीना है लल्लू?*

*पण एकदा गाई गाई यायल्या लागली की कविता स्फुरतात.. त्यात अर्धवट झोपेत इकिगाईची 'इका'गाई झाली. त्याच या 'इका'गाईच्या कविता!*
*यात वात्रट-इका पासून ते पॉलिट-इका आहेत. फक्त वाचताना कोणी खरोखर 'आली बघ गाई गाई' न म्हणो म्हणजे मिळवले!*

-डॉ.नितीन मोरे

२.

## मालविका

बाय वन.. गेट वन!

एकेक शब्द अनेक जोडून
हवे-नको तिथे तोडून मोडून

नाही जाणत व्याकरण बिकरण
कविता म्हणजे शब्दांचे शिकरण

शब्दांची कणीक मळत मळत
कवितांची बनवून आणली चळत

घ्या एकावर फ्री एक
उचला माल आहे दिलफेक

एकदम माल क्वालिटी हाय
परफेक्शन शिवाय बातच नाय!

नाही बरे हा सेकंडचा माल
विकणार नाही सालोसाल

आज पुरतीच आहे ऑफर
माल आहे एक नंबर टॉपर

होलसेल चा लावला रेट
रिटेल मध्ये विकतो थेट

उचला एक एक बघता काय
एकावर एक फ्रीच हाय!

-डॉ.नितीन मोरे

# 'इका'गाईच्या कविता

अनुक्रम


१. शब्दिका
२. वात्रटिका
३. कोटिका
४. संगणिका
५. सुविचारिका
६. कविकलिका
७. पॉलिटिका
८. कंटाळिका
९. अगम्यिका
१०.वास्तविका
११. व्हॉट्सॅपिका
१२. स्वयंपाकिका
१३. गुगलिका
१४. समकालिका
१५. विद्यालिका
१६. रोजगारिका
१७. संदेशिका
१८. टकलिका
१९. चिंतनिका
२०. मलाईका
२१. संसारिका
२२. मंत्रिका
२३. प्रेमिका
२४. विरूपिका
२५. 'गाई'का

# शब्दिका

१.

शब्दांचा भरला
ओसंडून सागर
शब्दांचे पाणी
शब्दांची घागर

शब्द लावती
पिसे जिवाला
शब्दच असता
तमा कशाला

शब्द बापुडे
केवळ वारा
शब्द म्हणजे
तरी निवारा

शब्दांचेच असे
असते एक जग
शब्दच बनविती
वा तोडतात मग

पहावे तिथे
शब्दांची सृष्टी
शब्दच देती
शब्दांना दृष्टी

शब्दसृष्टीचे कुणी
असती ईश्वर
शब्द अमर
बाकीचे नश्वर

शब्दच असती
आश्वासक सुंदर
शब्दच असती
शस्त्र भयंकर

अबोल शब्द ही
काही असती
निखळ भावना
त्यांची महती

घडे शब्दांनी
इतिहास जगाचा
घडे शब्दांनीच
ऱ्हास जगाचा

शब्दच असती
कितिदा शस्त्र
शब्दच प्रसवे
काव्य विनोद शास्त्र

असंख्य काळीज
शब्द जोडती
असंख्य हृदये
शब्द मोडती

शब्द घडविती
शब्द मोडती
जपून वापरा
शब्द तोडती

जन्मापासून
शब्दच संगती
शब्दांची महती
शब्द सांगती!

२.

## गमक

शब्दांचीच बनवून भेळ
त्यावर शब्दांचीच पसरू चटणी
तिखट गोड आंबट चावट
ऐकून भटाला मारेल भटणी

म्हणाल तुम्ही इकडे
भट भटणींचे काम काय?
कवितेसाठी आले बिचारे
खाली डोके न वर पाय!

शब्द कधी कधी टांग देतात
यमके बिमके नाही जुळत
अशा वेळी कुणी बिचारे
शब्दच येतात धावत पळत

म्हणतात वापर बुवा तू
जुळून जाऊदे एकदाचे यमक
शब्दच पुरवतात हौस कविची
कविच्या कवितेचे हेच गमक!

३.

## आश्वासन

कुणी शहाणे देती
शब्द तो निव्वळ
उदार राजा वाटे
आश्वासन पोकळ

पुरते त्यांना
शब्दांचीच सेवा
पुरवून खा म्हणती
शब्दांचा हा मेवा

शब्दांचाच भात
शब्दांचीच कढी
सढळ हस्ताने
राजा सर्वांना वाढी!

४.

**शहाणा!**

शहाण्यास म्हणे
शब्दांचा मार
गळ्यात घालती
शब्दांचा हार

रिकाम्या बैलाचा
कुणी अतिशहाणा
करे शब्दांचा उतारा
शब्दांचा बहाणा

# वात्रटिका

१.

**आम्ही वात्रट!**

वात्रटांच्या राज्याचे
आम्ही चतुर शिलेदार
चकलीच्या सोऱ्यातून
बुंदी पाडू दाणेदार

जाताना कुणी समोरून
दिसते आम्हास वाकडे नाक
ताठ मानेने जाणारा कुणी
पण दिसतो आम्हास त्याचा बाक

कुणी बोलतो एक त्याचा
अर्थ दिसतो आम्हाला दोन
संगतीत दिसते विसंगती
बघण्याचा म्हणे दुसरा कोन

वंदितो पाऊले आम्ही त्याची
बोले तैसा जो न चाले
पुरवता तो माल कच्चा
राजा बोले अन् दळ हाले

आम्हाला मग चढतो चेव
हाती लेखणी घेऊन बसतो
कुंचल्यांचा फटकाऱ्यातून
किंवा टोचणी देऊ करतो

आमचा असे नाइलाज
आम्हाला उल्टेच सगळे दिसते
मुसळ काय कुसळ काय
आम्हाला सारेच खुपते

येता जातो हसतो आम्ही
पण शेंबूड म्हणे आमच्या नाका
उल्टा म्हणतो चष्मा आमचा
म्हणून करतो वरती खाका!

२.

## अवात्रट!

तिला काहीतरी म्हणालो
तर ती रागावून म्हणाली,
चल, वात्रट मेला..
झाला तेव्हा पुनर्जन्म जणू
तेव्हापासून फिरतोय असा
अवात्रट बनून!

# कोटिका

**शब्द गारूडी!**

कोटीचा म्हणे
त्याला हव्यास होता
समजत स्वतःला तो
महाकवी व्यास होता

शब्द दिसला की
करायचा तोडमोड
अर्थ अनर्थ काहीही
शब्द कसेही कडू-गोड

त्या शब्दांवर त्या वयात
कुणी एक भाळली होती
कित्ती कित्ती गोड गोड
असे त्याला म्हणाली होती

त्याने झाले एकच फक्त
कोट्याधीश स्वतःस समजू लागला
कल्पनेच्या भराऱ्या मारत
आकाशी उंच उडू लागला

कोटीकोटी केल्या कोट्या
सत्य नि कल्पनेत पडले अंतर
ही कोटी नव्हेच त्या कोटितील
कळले त्याला खूप नंतर

कोटीबाज कोट्याधीश
आता पण करतो काय?
शब्दखेळाची जडली सवय
अशी तशी जाते काय?

गारूड्यासारखी पुंगी घेऊन
शब्दांना तो वाकवत फिरतो
शब्दांचेच साप शब्दांची पुंगी
टोपलीत घालून घेऊन फिरतो

खेळ करून फिरवतो तेव्हा
टोपलीचे झाकण दामासाठी
मोजतो नाणी नाणी नि ठेवतो
खिशात मोजून कामासाठी

आता येतो घरी तेव्हा
ती असते करवादत नुसती
शब्दांचा गारूडी मी, शब्दांचे खेळ
करून मिळवतो दाम, जोडतो पुस्ती

कोट्याधीश तो, शब्द घेऊन
घराबाहेर पडू लागला
नंतर नंतर झाले इतकेच
आटेदाल का भाव समजू लागला!

# संगणिका

१.

**फॉर्मॅटिंग**

माझ्या आयुष्याची बनतेय
शंभर जीबी फाइल
एकेक क्षण
साठवला जातोय मेमरीत
नाही पुरली तर
लावावी लागतेय
एक्सटर्नल हार्ड डिस्क
करू म्हणता होत नाहीत
काही गोष्टी इरेझ
आणि कुणी म्हणतोय
करा फॉर्मॅट परत
आयुष्याला!

२.

## रिट्रिव्हल

तू म्हणजे आहेस
माझ्या जीवनाची हार्ड डिस्क
सगळे काही करतेस
जुनेपुराणे सेव्ह
वर्षानुवर्षे
आणि कधीही करतेस
रिट्रिव्ह तो डेटा
भांडताना..
कसा गं इतका
सुपर फास्ट
संगणक तुझा?

३.

## क्लोज ऑल

स्वामीजी म्हणाले
दरबारात येताना
बाकी सारे टॅब बंद करून या
उघडा फक्त नवीन
भक्तीचा टॅब!

४.

## पेन ड्राइव्ह!

समजू नकोस
मला तू
उगाच एक पेन ड्राइव्ह!
वाटले तेव्हा
अटॅच केला
नको तेव्हा
काढून टाकला!

# सुविचारिका

१.

**शिक्षण**

त्यांनी सांगितलेले,
आम्ही ऐकलेले
सुविचार ..
म्हणजे चांगला विचार
ऐकले होते आम्ही
एक दोन नव्हे तीन चार..

ऐकत ऐकतच झालो मोठे
महान नि उदात्त
सुंदर आणि सरळ
सुविचारांची दुनिया..
कित्येक विचार तर असे की
वाटावे, ऐकतील सारे तर
महन्मंगल होऊन जाईल
सगळे काही.. अगदीच
बदलून जाईल even बनिया

मोठे होऊन बाहेर पडलो
जगामध्ये फिरू लागलो..
कोणा एकाला म्हटले ..
ऐकले नाहीत का
ते.. सुविचार?
तो म्हणाला, अर्थात .. अर्थातच
त्याशिवाय का कोणी मोठे होते
पण एक शिकला नाहीस..
सुविचार फक्त शिकण्यासाठी..
त्यावर अंमल म्हणजे निव्वळ अविचार..

विचार केला..
अजून विचार केला
पाहिले आजूबाजूस..
म्हटले, अरेच्चा खरंच की!
हे शिकायचे राहूनच गेले की!

२.

## (सुविचारांच्या) मोत्यांचा चारा!

अर्ली बर्ड!
ते म्हणतात
अर्ली बर्ड कॅचेस द वर्म..
पण वर्म्स ना कोणी
नाही शिकवले हे मर्म?

**सत्य**

१
सदा सत्य बोला
सदा सत्य चाला
जोवर होत नाही
हितसंबंधांचा काला
२
सत्य वदे वचनाला नाथा
मारू नका म्हणून लाथा
दिवस हे प्लास्टिकचे
चालत नसे हल्ली काथा

## सचोटी

सचोटी इज द पॉलिसी बेस्ट
बाकी सर्व म्हणती अगदीच वेस्ट
म्हणती ऐकावे जनाचे करावे मनाचे
तर हे ही करून पहावे टेस्ट!

## वचन

दिल्या घेतल्या वचनांची
ठेवा अशी चेकलिस्ट
कुठली वचने तोडली ते
तरी माहिती पडे ॲटलिस्ट!

## उधारी

जे आपणापाशी नाही मागा
फक्त आठवड्यात सातवार
बाकी वारी नका करू
उधार न उसनवार

# कविकलिका

१.

**माझी कविता!**

एक शब्द जोडू
बाबा
दोन शब्द जोडू
फेव्हिकाॅल लावू चला
छान कविता पाडू

त्याच्याकडे आहे तसा
मला हवा झाऱ्या
पाडेन मी बुंदी अशी
कवितांच्या साऱ्या

वळणावळणाची घालेन
जिलबी गोड गोल
जमेल ना मला सारे
नाही होणार ना फोल?

अर्थगर्भ पाडू काव्य
अर्थपूर्ण अर्थभरीत
भाजीत भाजी मेथीची
अन् वांग्याचे भरीत

प्रसवू चार दहा ओळी
वा चवदा ओळीचे सुनीत
शोधू अर्थ जीवनाचा काढू
ताक घुसळून नवनीत

जर मिळेल अवसर
महाकाव्य ही प्रसवेन
वाल्मिकीनंतर मीच
वाल्याला बसवेन

उघडून बसेन शब्दांची
सताड पोतडी
जोड जोडून शब्दांस
बनवीन गोधडी

कुणी म्हणे काव्य त्यास
कुणी म्हणेल कविता
दीपतील डोळे त्यांचे
असो शशी वा सविता!

२.

## माझी कविता.. २

शब्दांची चटणी
शब्दांची भाकर
शब्दांचा ठेचा
शब्दच उत्तर

जुळवू पुरवू
शब्द एक एक
जोडून मोडून
घेऊ प्रति एक

बनेल मग ती
कविता सुंदर
पळवून तिजला
नेईल बंदर

शब्द शब्द ना
जपून ठेवीन
फुलाफुलांपरी
त्यांना ओवीन

कविता कवितांतून
शब्द ते योजीन
योजिता योजिता
शब्द ते मोजीन

शब्दांची बनवीन
भेळ बहुरंगी
कविता सुंदर
बने अतरंगी

शब्दांचे कुरमुरे
शब्दांचीच शेव
फरसाण चटणी
फुटे कवितांचे पेव

मनहृदयी कल्पना
घालीन घोकून
कवितेत भरीन
भावना ठासून

ऐकावेच लागेलच
ऐकतील सारे
काव्य संमेलनात मी
उभा जो मारे

काव्यजागर अखंड
प्रहर दो प्रहर
जनामनातून होई
टाळ्यांचा गजर

आम्हाघरी धन
शब्दांचे रायट
आम्हाघरी भोजन
शब्दांचे डाएट!

देवाचा लाडका
बघा माझी आइट
म्हणवतो स्वतःस हा
'दुर्बोध' पोएट

३.

## कवी: एक वास्तव

अय्या तुम्ही काय बाई कवी!
ऐकले होते ते तुझे शब्द
त्यावेळी ..
आता करवादतेस फक्त
वेळी अन् अवेळी

यक:श्चित दुनियेची
नसे मजला तमा..
म्हणतेस तू कशी
लागतो तुला दमा

ओरप कढी कल्पनेची
घे हा कल्पनेचा भात
थकले म्हणे भाडे सगळे
त्यासाठी का राबू दिनरात?

दिसते सारे सुंदर सुंदर
बघ माझ्या नजरेस कसे
तुला हवी ह्या दुनियेची बात
सांभाळतेस म्हणे कसेबसे

मागतेस उगाच काहीबाही
कवी तिथे काय कमी?
चांदण्या तारे चंद्र
आकाशीचे खुडतो मी

काव्यपिसारा फुलवून
नाचे मनचा हा मोर
तुला न कौतुक म्हणशी
जरा सांभाळ हे पोर?

४.

## शब्द बापुडे..

कुणी शब्द देता का शब्द
शब्दांनी फुलवेन
मी कवितेचा पिसारा
शब्दांचा फुलोरा
शब्दांचा मनोरा..
कोण म्हणाले ते
शब्द? शब्द बापुडे
निव्वळ वारा?

# पॉलिटिका

.. अर्थात राज-का-रण!

१.

**निवडणुका जाहीर झाल्यात..**

निवडणुकीच्या रणांगणातील, ऐका सांगतो गंमत जंमत
मांडीला लावून मांडी जेवाया, बसली ती रंगत पंगत..

कुणी सत्ताधीश कुणी विरोधी, कुणी अपक्ष कुणी नुसतेच बघे
रणधुमाळी शिंग फुंकले, सर्वांचीच ती फौज निघे

कुणी फोडिली सेना दुसऱ्याची, सेनापती कधी होई फितुर
कुणी मांडितो हिशेब ऐसे, बघुनिया तो अति चिंतातुर

सुरस लिहूनी काढती गोष्टी, जाहीरनामा म्हणती त्यास कुणी
एकेकाच्या काढती खोड्या असल्या, उघड्यावरती ती धुत बसती धुणी

कुणी मारितो अशा बढाया, स्वतःस तो घोषित करत गुणी
मजवाचून न तरणोपाय, म्हणे सदैव माझे रहा ऋणी

देशभक्तीचे लोटती महापूर, वाहे दुथडीभर भाषण गंगा
कुणास वाटे नसे पुरे ते, घडवून आणित तो दंगा

अमूल्य तुमचे मत म्हणती ते, जन भल्याची असते चाड
तुमचे एक मत द्या एकमताने, वाचून आश्वासनांचे हे बाड

मागील वेळीस म्हटले ते ते, केली नाही का पूर्ती
मीच तुमचा रक्षण कर्ता, ह्रदयी बसवा एकच मूर्ती

करेन मीच उद्धार तयाचा, मीच एक रक्षण कर्ता
आकाशी तो भगवंत असे अन, इथे मीच सुखकर्ता अन
दुखहर्ता

२

## जिंकलेले पक्ष:

किती सांगू मी सांगू कुणाला
आज आनंदी आनंद झाला
शपथा घेऊ चला मंत्री होऊ चला
आला आला रे निकाल आला..

निवडणूकीच्या दिवशी, बूथ बूथ वरती, मतदार उभे राहिले
दाबिले ते बटन, एका एका मागून, इकडेतिकडेही ना पाहिले
ते हरले ही हुप्प, आता बसतील चुप्प
मिळाला, लोकांचा सपोर्ट मिळाला
आज आनंदी आनंद झाला

बातमी अशी साजरी, ही सगळीकडे गाजली, जिंकली विधानसभा ही अशी
कुणी म्हणा रिगिंग, कुणी म्हणा व्होटिंग, जिंकण्याला नावे कशी
आता घेऊ शपथ, धरू सत्तेचा पथ
झाला झाला रे उत्कर्ष झाला
आज आनंदी आनंद झाला..

खेळ आता रंगेल, स्वप्न कुणाचे भंगेल, बसणार मंत्रीपदी
आलो आता निवडून, बहुमताने जिंकून, मिळणार चान्स कधी
आता सत्ता येईल, लाल दिवा येईल
सारा खर्चच वस्सूल झाला
आज आनंदी आनंद झाला

३.

## नव निर्वाचित विरोधी

सध्याचे सत्ताधारी आता हरलेत :

कशी मांडली नशिबाने, घोर घोर ही थट्टा
गेली बुडाखालून खुर्ची, उरला हाती खलबत्ता

इतक्या वर्षांचे राज्य, कसे ते आता सरले
राव चढले खुर्चीवरती, पंतांहाती काही का नुरले

आठवित बसती कसला, असला तो होता रूबाब
हांजी हांजी करती सारे, देत बिन सवाला जबाब

पाच वर्षे हाय आता, वाटतील युगायुगा परी
घरधनीणीस दाखवू तोंड, हाय आता मी कसे घरी

कशा उडवाव्या आम्ही, आमच्या सरकारी गाड्या
जनसामान्या हाती का, असाव्या आमुच्या या नाड्या

यासच म्हणती म्हणे का, कुणी असली लोकशाही
कधी शिळेपाके मिळे खावया, अन कधी बालुशाही

४.

## हे अपक्ष:

नाही रंग नसे रूप हर, घडी बदलती ग्रूप
कुणी म्हणे उभयाचर, कुणी म्हणती सरीसृप

जाऊ वळचणीस आम्ही, आम्ही तेथे जेथे कमी
शकट राज्याचा अधुरा, तर आम्ही येऊ कामी

आम्ही अपक्ष अपक्ष, आमची यात्रा चार धामी
देऊ कोणाला ही टेकू, आमची कल्पना ही नामी

गाळलेल्या भरतो जागा, राज्यहित असे उरी
तळमळ उत्कर्षाची, मनी असे खरीखुरी

ग्रह उच्चीचे जर असती, त्रिशंकू होईल सदन
धावून येऊ मदतीस, आम्ही सुहास्य वदन

नशिब जर देई साथ, मंत्रीपदही पदरी पडे
होऊ बिन खात्याचे मंत्री, चौघडे वाजती चोहिकडे

# कंटाळिका

## आळशी

तो म्हणतात एक नंबर
अति म्हणजे अतिच आळशी
तरीही पहा डोक्यावर त्याच्या
चढवलेली आहे चाळशी

आळसाचे राज्य त्याचे
त्या राज्याचा तो राजा
हलवत नाही हातपाय
उगाच वाजवत नाही बाजा

तो असतो बसून नुस्ता
देतो जांभया जोरदार
बसलेला मग लोळत राहतो
आलाय म्हणत कंटाळा फार

जांभया देणे इतकाच व्यायाम
कंटाळ्याची असली लहर
माशा पण म्हणतात, उडूया
बसून बसून करतो कहर!

# अगम्यिका

**म्हणजे काय?**

कळते पण उमगत नाही
उमगते पण समजत नाही
समजते पण कळत नाही..

कळते पण वळत नाही
वळते पण पळत नाही
पळते पण गळत नाही ..

गळते पण पडत नाही
पडते पण सापडत नाही
सापडते पण हाती नाही ..

आध्यात्मिक गुरूजींच्या
प्रवचनासारखी कविता
कविता जमते जुळते पण..
समजत उमजत कळत नाही..

# वास्तविका

१

**शहामृग!**

वाळूमध्ये
डोके खुपसून
बसलाय तो
शहामृगासारखा
थंडगार वाळूत
जाणवत नाही
वास्तवाच्या
विस्तवाची धग!

२.

**खाली डोके..**

पळा पळा कोण पुढे पळे तो
जाईल जितका दूर दूर तोच तो जिंकेल तो..

पळत सुटा धावत सुटा
पण वास्तवापासून रहा सुटा
परिस्थितीच्या रेट्यापासून
धकाधकीच्या खेट्यापासून
पळत सुटा पळत सुटा

म्हणजे मग होईल काय
खाली डोके वर पाय

वास्तव असे पहायचे नसते
उलटे पहा किती छान दिसते..
छानच दिसते!

३.

**अर्धा पेला..**

उगाच बसतोय
करून तोंड लांब
भरलेला पहा अर्धा पेला
आता तिथेच थांब

पूर्ण भरण्याची कशाला
पाहतोयस वाट
जे आहे ते तर पिऊन घे
उडवून दे थाट..

४.
**म्हणे..**

त्या शहरातील
म्युझियम मध्ये
दुर्मिळ गोष्ट
आलीय म्हणे..
लोकांची एकच
झुंबड उडालीय म्हणे..
त्यांनी एक
प्रामाणिक माणूस
डिस्प्ले मध्ये ठेवलाय म्हणे!

# व्हॉटसॅपिका

❤❤❤❤❤

मिस यू सो मच😢😘
आय टेल्यू 👩
यू 👩आर ॲन इंट्रिगल
पार्ट आॅफ माय मिल्यु😌

भेटलेलीस 💑 त्याला
झाले कितीतरी तास ⌛⌛
आठवतेस तू अन 😘
वाटू लागते उदास 😒

काळजात💓 माझ्या
केलेस तू घर 🏠
भेट 👫तू लवकर अन्यथा
सुरू होईल घरघर 😱😮😭

माझ्या काळजात ❤
वाजे समथिंग समथिंग ⏰⏰
तू 👩न भेटलीस तर
सारे जग नथिंग नथिंग 😭

विझव तू 👩 येऊन आता
आग 🧯 माझ्या ह्या दिलाची🧡❤️‍🩹
सारे जग 🔮 एकीकडे
मला न पर्वा कोणाची 😎😎

शोधतो 🔭👀 मी तुला
पाना फुलांतून ☘️🍀🌿🌷🌹
गाणे 🎼🎼 तुझ्यासाठी नकळत
गातो 🎤🎧हे आतून

माझ्या दिलाच्या कुलुपाची🔒
तुझ्याकडेच ग किल्ली🔑🔓
तू 👩 असता कशी ग
राहिल दूर 🚡🚠 दिल्ली

💕💞💓💗💖💘💝

🎯
💬💬💬
📣📢📣

इये समाजमाध्यमाचिये 📲📲 नगरी
शिकून ✍️ घ्याव्या या 4️⃣ चाराक्षरी
शिका न शिका विवेक नीराक्षरी 🥛🥛
मनाजोगा 😊

इथे प्रभातीच्या 🌄 समय🕚🕛करोनी
रविराज 🟡 गगनी येई उगवोनी
तद्वतच करावे 🧚🧚उत्थान जीवनी
अखंडित ⌛⏳

कराग्रे ✋ घ्यावा प्रथम तो भ्रमणध्वनी 📱
ऐकोन न घ्यावे कोणाचे कानोकानी 👂🦻
करावे चेक ते संदेशाचे 🖊️✒️धनी
उघडता नेत्र 👀

मोबाईलावरी व्हावे स्वार 🧑‍🦽
सकाळ 🌅संध्याकाळ 🎇वा दुपार
विचार 🧐 करू नये 🚫 फार
भररात्री 🌠

सदुपयोग करावा समयाचा⏰
त्याचा 🧐 समजावा एकच साचा
व्हॉटस्‌अॅप अन फेसबुकाचा ❗
करावा ✅✅ उपयोग‼️

16:38

# स्वयंपाकिका

१.

**फोडणीची लावणी**

ठेवली तपेली चुलीवरती
अन उपडा केला तेलाचा गडू
उपड्या तेलाच्या गडू मध्ये
मोहरी लागलीया तडतडू

त्या नादाने पापणी हिची फडफडली
- आणि बाई मोहरी कढईत तडतडली ..

जिऱ्याची फोडणी हिंगाची जोडणी
दरवळ सुटला चहूकडे जणू
मसाल्या मसाल्याचा सुगंध सुटला
पसरवून सगळे अणू अणू..

त्या गंधाने हिची नाकपुडी गं फडफडली
- आणि बाई मोहरी कढईत तडतडली ..

घातला तेलात गुलाबी कांदा
उभा अन आडवा कापून
लसूण हवा नि हवा कढिपत्ता
घाला की मोजून मापून

काळजात चर्र चर्र फोडणी जेव्हा कडकडली
- आणि बाई मोहरी कढईत तडतडली ..

घातल्या भाज्या ताज्या ताज्या
धुवून पुसून अन काटून कापून
चुलीवर आग न आगीतली धग
घेतल्या त्या तेलावर परतून

सुटला सुवास भाजीचा, खोली सारी घमघमली
- आणि बाई मोहरी कढईत तडतडली ..

अवचित आले तिकडून राया
म्हणती भुका लागल्या राणी

एकत्रच वाढ गडे बसू संगतीच
झाली लाजून ही पाणी पाणी

अवचित पाहून रायाला ही तर असली गडबडली
- आणि बाई मोहरी कढईत तडतडली ..

२.

**तक्रार!**

लहानपणापासून मी असाच..
असाच म्हणजे असाच..

लहान होतो तेव्हा चुकायचो
चुकलो की आई कणीक तिंबायची
पाठीचे अगदी वांग्याचे भरीत करायची
किंवा पाठीचे धिरडे!
तसा मी सावळा होतो
पिऊन हळद आणि गोरा झालो

'जिरे'टोप घालून नाटकात गेलो
गोऱ्या.. म्हणून लोकं म्हणाली की
आई लगेच मीठ मोहऱ्या ओवाळून टाकायची

वेळ गेला
तो जायला वेळ लागत नाही
मोठा झालो ..
शेवग्याच्या शेंगेसारखा उंच
आणि कुणी म्हणे
भोपळ्यासारखा फुगलो..

मग रीतसर लग्न बिग्न ..
अगदी सांगून गेलो
उगाच ताकाला जाऊन भांडे लपवणे कशाला?
मनात मांडे खावेत कशाला?
सांगून टाकले, आवडली ही जिलबीबाई
नावासारखी नि नावापासून गोड ..
मग उंबरठ्यावरले माप ओलांडून आलेली ही
(तेव्हा) चवळीच्या शेंगेसारखी..

मग हिने घेतला ताबा
स्वयंपाकघराचा नि माझा ही..

आता म्हणते ही
नाकाने कांदे सोलू नका..
किंवा मग
संध्याकाळी सांगते गोष्टी इकडच्या तिकडच्या
तिखट मीठ लावून
तोंडात हिच्या तीळ भिजेल तर!
तसं मसाल्याशी सख्य हिचे
डोक्यावर मिऱ्या तर वाटतेच..
पगाराची चटणीही झटकन उडवते..
मी बसतो आपली मिठाची गुळणी घेऊन
काही सांगायला जावे तर
नाकाला मिरच्या झोंबायच्या..
पण मी एक पाहिले आहे,
काही हवे असेल तर अगदी शिऱ्यासारखी गोड बोलते
आपण लावावा अंदाज..
तर ताकास तूर लागू देत नाही
आपली डाळ शिजणार नसतेच..

वर्षे सरली .. वय झाले

साठी सरली नि काठी आली..
हिंग लावून कोणी विचारत नाही ..
नि माझा होतोय नुसता तीळपापड ..

हे सर्व कुणाला सांगितलं ना की
नुसतीच खसखस पिकते..
म्हणतात, लेका तू असलाच..
रडतोंड्या नि रडत राऊत..
बदलायचा नाहीस अगदी..
कडू कारलं तुपात तळलं नि साखरेत घोळलं..
तरी कडू ते कडूच..

# गुगलिका

**वैद्यकसत्ता!**

करावा बिनधास्त
आजारावर उपचार
वैद्यकीय मते न
लागू येथे

जाणावी लक्षणे
गुगलावी नि वाचावी
करून निदान
उपचारावे

आपली प्रकृती
आपणासच ठावे
वैद्य उगाच करती
माथेफोड

विचारती उगाच
प्रश्न ते शंभर
मग शंभर तपास
गंभीरपणे

प्रकृती स्वतःची
त्यावर द्यावी हजार उत्तरे
त्यावरही उगाचच का
द्यावी फी?

कशास हव्या त्या
उचापती नसत्या
असता जवळी
गुगलसत्ता

स्वतःस समजावे
गुगल डॉक्टर
उगाच का मिजास
वैद्यबुवाची

हवेतर जावे
डॉक्टराकडे नंतर
जस्ट टू कन्फर्म
हीज नॉलेज

# समकालिका

१.

## आनंदी आनंद!

सगळे कसे हॅपी हॅपी
म्हणजे सगळीकडे
आनंद आहे..
सगळीकडे
शुभेच्छाच शुभेच्छा
शुभेच्छांचा पूर आहे

परवा आलेला तो मेसेज
त्यात म्हणे
विश यू मंगलमय मंगलवार

असे सारेच आठवडी दिवस
तसे आहेत हीरो सारखे
म्हणजे बुद्धीमय बुधवार वगैरे ..

कालच आला मेसेज एक
म्हणाला,
श्रावण महिन्याच्या हार्दिक शुभेच्छा!

त्या आधी आलेला
त्यात होता
हॅपी वैशाख, जेष्ठ, आषाढ

पाडवा होऊन गेला हॅपी
वटपौर्णिमा हॅपी
नागपंचमी पण आनंदी
बैलपोळा पण हॅपी..

हल्ली येतात अशाच शुभेच्छा
अगदी हॅपी
गणेश चतुर्थी सुद्धा ..

दसरा दिवाळीची
तर बातच नको..
सरते वर्ष हॅपी..

येणारे हॅपी
सगळे काही हॅपीच हॅपी

हॅपी हॅपी म्हणजे आनंदच आनंद..
थोडक्यात काय
सगळीकडे सगळाच
आनंदी आनंद आहे!

२.

## इव्हेंट्स

मार्केटमध्ये हल्ली
नसतात सणवार
असतात ते
फेस्टिव्हल बेस्टिव्हल..
आणि त्या अनुषंगाने येणारे
इव्हेंट..
खरेतर इव्हेंटस..

३.

## मृत्यू

खूप पूर्वी
दु:खद निधन व्हायचे कोणाचे
पळभर जन हाय हाय म्हणायचे
काही जेन्युइनली दु:खी व्हायचे
मग शोक बिक सभा घ्यायचे
गेलेल्याला आपण इतके चांगले होतो ऐकून
थडग्यातही गहिवरून यायचे..

आता मरण तेच..
कोणाचेही असो
फेसबुकवर बातमी ..
मग असंख्य आर आय पी.. नव्हे पीस..
आणि काही संस्कृती अभिमान्यांचे
संस्कृतात ओम शांती..

हल्ली आर आय पी
लिहिल्यावाचून
आत्म्यास शांती मिळत नाही म्हणे..

४.

## आर्मचेअर देशभक्ती!

जिकडे पहावे तिकडे
आलीय देशभक्तांची लाट
कुणी विचारा काहीतरी
करून टाकतील सपाट

ऐकून आहे की देशभक्तीचा
घेतलाय यांनी सारा मक्ता
कसा, कोणी, किती रूपयांत
विचारू नका, असेल उक्ता

दिवस चांगले इतके देशाने
नव्हते कधीच पाहिले
देशभक्तीचे लोण वाऱ्यासम
कधीच नव्हते बरं वाहिले

देशभक्तीची व्याख्या आहे
यांची इतकी साधी सोपी
विरूद्ध कोणी तो विघातक
घालावी फक्त यांचीच टोपी

कोण रे तो असे विरोधी तो
मारा झुंडीने टोचून टोचून
करून टाका सळो की पळो
ओरबाडून टाका त्याला बोचून

एक शब्द नका उच्चारू
ताकीद यांची आहे सक्त
नवभारती फौजा यांच्या सदा
तैनाती आर्मचेअर देशभक्त

५.

## मल्लिनाथी!

उचलावी जीभ
लावावी टाळूस
विचार उगीच
करू नये

जिथे तिथे फेकावी
मताची पिंक

असे सार्वजनिक
समजावे

वापरावी भाषा
शिवराळ प्रक्षोभक
पाळणे डिकोरम
नाही जरूरी

राजकीय असे तर
सोन्याहून पिवळे
उचलावी तळी
सोयीने

म्हणावे कोणास
देशद्रोही बिनधास्त
पाठवून द्यावे त्यास
परदेशी

विरोधी मताची
कशास पत्रास
उगाच मिजास न
खपवावी

समजावे स्वतःस
मल्लिनाथ महान
इतरां लहानसहान
समजावे

स्वतःहून न कोणी
परफेक्ट या जगी
समजून उगी
राहू नये!

६.
## मॅगी विद्वान

स्वामीजी म्हणायचे,
अभ्यासोनी प्रकटावे
गुरूजी म्हणायचे,
अभ्यास करा
विचार करा
मनन करा
चिंतन करा..

विचार करतोय
कशाला इतकी यातायात
इकडे सारे काही
मॅगी नूडल्स सारखे
इन्स्टन्ट..
फेसबुकवर लिहायची
विद्वत्ता
बस्स!
दो मिन्टोंमें तय्यार!

७.

## बरोबर

तुम्ही आमच्या
असाल बरोबर
तरच
असाल बरोबर
कारण?
कारण
बरोबर नि चूक काय
याची व्याख्या

आम्ही बनवू
तीच बरोबर..

८.

**उथळ**

खळखळाट फार
उथळ पाण्यास
उरली किंमत
आता फक्त नाण्यांस

बद्द वा खणखणीत
नाणी आवाज करती
असो किंमत कितीही
असे त्याचीच चलती

अभ्यासोनि प्रकटावे
जमाना तो जुना झाला
करा आवाज, टाका पिंक
सोन्याचा त्या भाव आला!

# विद्यालिका

**शाळा!**

बीजगणितातला क्ष
भेटला त्या दिवशी
आणि म्हणाला,
किती मजा होती नाही?

ते हौद नि त्यांच्या
त्या सदैव गळक्या तोट्या
एक धड नळ रिपेअर नाही होत
नि मारे त्या बाता मोठ्या..

व्यास नि कंस नि परीघावरून
मग भेटली वर्तुळाची त्रिज्या
म्हणालो, बाई गं कशी आहेस?
उडवला होतास तू आमचा फज्जा

आठवते अजून इतिहासाशी लढाई
नि इतिहासातल्या घनघोर लढाया
सन सनावळया नि राजांच्या लायनी
नि विजेत्यांच्या मारलेल्या बढाया

भूगोलातील गोलाशी सख्य
जमले होते लहानपणी पार
खंड भूखंड पिके नि हवामान
लक्षात ठेवता पिकलो फार

शास्त्राची अशास्त्रीय गत नि
भौतिकातली अभौतिक सूत्रे
रसायनातील परीक्षानळीत
जीवशास्त्रातील हरवली गुणसूत्रे

घनघोर व्याकरण अन् भाषा साऱ्या
विषय ते नव्हते कधीच स्कोअरिंग
समास संधी काळ वचन विग्रह
घोका नि ओका, असो कितीही बोअरिंग

भाषा विषयाची नसेलही
पण भाषा वापराची आवड फार
वर्गात बोलताना वापरल्या म्हणून
खाल्लेल्या पट्ट्या आठवतात चार!

२

## भोलानाथ

सांग सांग भोलानाथ
पेपर फुटेल का
परीक्षेआधी प्रश्न कळून
पास मी होईन का?

भोलानाथ भोलानाथ
खरं सांग एकदा
आयुष्यात परीक्षा
येतील का फक्त तीनदा
भोलानाथ.. भोलानाथ..

भोलानाथ उद्या आहे
कसलातरी पेपर
विषयच आठवत नाही
लिहिणार काय मी तर?
भोलानाथ.. भोलानाथ..

भोलानाथ शिक्षणाचे धोरणच
बदलेल काय
बिन परीक्षा सगळी जणे
पासच होतील काय?
भोलानाथ.. भोलानाथ..

# रोजगारिका

१.
'!'

उठून सकाळी म्हणतो तो
झाली अजून सकाळ एक
हाताला नाही काम म्हणून
तिकडे इकडे नुस्ती अर्जफेक

इतके करणार निर्माण रोजगार
टीव्हीवर कोणी बोंबलत असतो
जांभया देत पण न कंटाळत तो
कान देऊन ऐकत असतो

आशेवरती जगते जग
म्हणून तो जगत असतो
अर्जविनंत्या ऑफिसच्या चकरा
न कंटाळत मारत असतो

बेरोजगारांच्या फौजेमध्ये
होतो मग भरती तो
बघ केलीच ना भरती कुठे
नेता त्याला सांगत तो असतो!

२.

## क्वालिफिकेशन

रोजगाराची आम्ही
देतो हमी
कामाची नाही
इकडे कमी

असले तसले
चालत नाय
हायली क्वालिफाईड
शिवाय बातच नाय

मॅट्रिक बिट्रीक
चालतच नाय

डिग्रीशिवाय
कमी नाय

बी एस्सी वाला
खडी फोडतो
एम ए होऊन
तो शिपाई बनतो

पीएचडी होऊन
करतो काय
फायलींना तो
फोडतो पाय

म्हटले ना..

असले तसले
चालत नाय
हायली क्वालिफाईड
शिवाय बातच नाय!

# संदेशिका

**साध्या ही विषयात..!**

१.

**पसारा!**

( बाहेर जाताना बायकोने दिलेली ही आज्ञावली.
शोधा म्हणजे गहन अर्थ सापडेल!)

नीट आवरून ठेव
पसारा तुझा
घे धुवून ती
भांडी उष्टी
धोपटून धू ती
धुणी
लावून ठेव सारे घर ..
लख्ख नि चकचकीत!

२.

**मोबाईल!**

मधून मधून कर
बॅटरी चार्ज
नि टाकावाच लागेल
मध्ये मध्ये रिचार्ज
चार्जिंग आणि रिचार्जिंग
जरूरी आहे
सुरळीत चालण्यासाठी!

३.

**शोध!**

शोधाल तेव्हा सापडेल
काखेतला कळसा
गावभर मारून याल
नाहीतर उगाच वळसा..

४.

**अर्थ!**

शोधलात तर
दिसेल प्रत्येक गोष्टीत
सांकेतिक अर्थ..
फक्त तेथे पाहिजे
जातीचे!

# टकलिका

१.

**केशवर्धिनी!**

करा केशवर्धिनीने मालिश
तुळतुळीत डोक्यास करा पॉलिश
टर्म्स अँड कंडिशन्स डू अप्लाय
एकावर एक फ्री वुई डू सप्लाय
सुपीक जमिनीवर येतील कोंब
मग वापरा हवा तितका कोंब
पीक न आल्यास वापस पैसा
मारा मग हवी तितकी बोंब!

२.

## टकलाची कविता

खिशात उगीचच कोंबून कोंब
का फुटतील डोक्यावर कोंब?
बायको मिऱ्या वाटते डोईवर
केसांची असणार नुसतीच बोंब

सांगू कुणा हे सीक्रेट ओपन
उगाच कोणाला अगदीच झोंब
आपलीच जाया अति उत्साहे
बांधेल मग आपुलाच tomb

३.

## तो!

डोईवरच्या जावळाने लावली
काळाबरोबर उगाच रेस
एक गेला गेले दोन
एकेक करून गळले केस

डोक्यावरचे उडले छप्पर अन्
झाला तो एक गाॅन केस
म्हणे उडले असतील सारे तरी
तारूण्याने ना ओलांडली वेस

म्हणे, समजू नका या केसांनी
आणला माझ्या तोंडाला फेस
तुळतुळीत अन् तुकतुकीत
मेंदूचे लक्षण, यात काही नाही मेस!

४.

## हिशेब!

तुळतुळीत डोक्याकडे
बोट दाखवून
तो म्हणाला,
हिने उकरून काढलेल्या
एका भांडणात
गळतो एक केस..

आता बघून
तुम्हीच हिशेब लावा!

# चिंतनिका

१.

**ध्येय!**

कोण तू?
कुठून आला?
या धरतीवर
कशास आला?

का धाडले
नियंत्याने तुज
विचार पडला कधी
आहे का तुज?

विचारत होते गुरूजी
असले काही
मी मुंडी हलविली
माहित नाही!

म्हटले, प्रश्न एकच
नाहीत सत्तर
गुरूजी सांगा
द्या त्याचे उत्तर

समोर ही
उडते माशी
चिंता न तिज
कसलीही जराशी

कीडे मकोडे
किंवा घ्या हे
झुरळ पाल
कशी ढुंकून पाहे

जीव जंतू ते
पक्षी प्राणी मोठे
त्यांना प्रश्न हा
पडला कोठे?

मांजर कुत्रा
गाढव घोडे
करतात का
विचार थोडे?

माणूस हा ही
ना असतो प्राणी
भागधेयाची का
गावीत गाणी?

२.
## फिलॉसॉफी!

म्हणजे काय?
काही नाही..
म्हणजे काय?
नाही काही..

म्हणजे म्हणजे?
माहित नाही अर्थ

उगाच मेहनत
कशाला व्यर्थ?

उगाच धावा
फिलॉसॉफी मागे
उसवा उगवा म्हणे
जीवनाचे तागे..

उभे आडवे धागे
म्हणजे ताणे नि बाणे
कळत नाही ज्यांना तेम
थोडीच पडती उताणे?

३.
## **चिंता!**

स्वामींनी सांगितले
चिंता करू नका
चिंतन करा..
आम्ही तेच करतो

पण आमचे चिंतन
पुरेसे पडेल का
याची मात्र
चिंता सतावते!

४.
## विचारवंत

चिता आणि चिंता
यात म्हणे
टिंबाचे अंतर एका..
तरीही आम्ही
सोडत नसतो
आमचा असला हेका..
काळजी आणि चिंता
धरतात आमच्या
आयुष्याचा ठेका..

असली काही
गंभीर वगैरे

तो कविता करतो
आणि तितक्याच गंभीरपणे
लांब तोंड करून वाचून दाखवतो..
हल्ली साऱ्या व्यासपिठांवर
बोलावतात त्याला ..
खरंच,
..कालच पाहिले मी त्याला
विचारवंतांच्या सभेमध्ये!

५.

## किल्ली!

प्रश्नांचा बनवा उंदीर आणि
धावा मागे बनून बिल्ली
प्रश्न असो गहन कितीही
त्याची आहे एकच किल्ली
प्रश्न असो किती कठीणसोपा
म्हणोत कोणी त्याला 'सिल्ली'
उपाय सोपा त्यावर एकच
प्रश्नाची उडवा खुशाल खिल्ली!

# मलाईका

१.

**तळे राखी..**

उपजीविका कशास
नुसतीच पोटापुरती
पलिकडे या शोधतात
माणसं जी शहाणीसुरती

शोधावा धंदा असा की
मिळते ज्यात कमाई
अनॉफिशियल तर उत्तमच
मारा मग त्याची बढाई

असेल अति छान छान
नोकरी सरकारी वा धंदा
ज्यात वाजवून घेता येईल
खणखणीत रूपया बंदा

द्यायचे उदाहरण तर
काय त्यांची कमी
लावा थोडी अक्कल
अन् लढवा शक्कल नामी

सांगतो काय म्हणून
येऊ द्या डोक्याला शॉट
तयार ठेवा सारी भांडी
तांब्या चरवी वा टिनपॉट

करून ठेवा सगळ्या
भांड्यांना छान कल्हाई
धंद्यात दुधाच्या या
मिळवा बक्कळ मलाई

राखेल तळे तोच
त्याचे चाखेल पाणी
होईल तळेकरच राजा अन्
तळेकरच बनेल राणी!

२.

## नोकरी

होईल वरकड जेथे वरचढ
शोधा नोकरी अशी
आखूडशिंगी बहुदुधी ही
कामधेनू ही जशी

पगार घ्यावा नोकरीत अन्
वरकड मोजून घ्यावा दाम
खेळा हजार लाखांमध्ये
समजा हेचि असे ते काम

ओव्हरटाईम हक्क असे
जो जन्मसिद्ध हा जसा
सोडू नका तो बरे कधीच
घ्या प्रथमच दिवशी वसा

कमाई म्हणजे देवी लक्ष्मी
सोडू नये तिची साथ
सद्विवेका पाठवा रजेवर
घालून पाठीवरती लाथ!

# संसारिका..

१.

**नवथर**

ऑफिसात जावे सकाळी
नजर लावूनी संध्याकाळकडे
नवथर मी, नव नवरा तो ही
म्हणे वाटे येऊ, सर्व सोडूनी गडे

मोगऱ्याचा नाजूक गजरा
येताना घेऊन येत गडे
मी ही असते तयारीत
तयार असती गरम वडे

माळूनी गजरा म्हणे मालिनी
वडे किती खुसखुशीत गडे
म्हणतो मी हसले की पडती
दारी जणू प्राजक्ताचे सडे

गप्पा होती नवथर अवखळ
पडती क्षणोक्षण प्रेम सडे
किती मधुर अन् किती मुलायम
प्रीत अजूनच मज बरे जडे

रातराणी मग फुले अंगणी
सुगंधित पडती दारी सडे
क्षण सरती सुंदर झरझर
निशा नशीली अशी चढे

२.

**सौ.कल्पना**

वास्तवाची वास्तविक
जाहली जाणीव
त्याच्या शिरी तेव्हा
उगवली शहाणीव

म्हणाला, छान होते
ते दिवस कल्पना रम्य..
होता आनंदीआनंद अन
स्वच्छंदी सारे गम्य

आता सरले ते दिन
आठवण ती राहिली
बदलले ते लग्नानंतर
आधी स्वप्ने जी पाहिली

तेव्हा ही कल्पना होती
आताही तीच आहे
तेव्हा कल्पनाची ओढ होती
आता सौ.कल्पनाचा जाच आहे!

३.

## वाकड्यात..

वाकड्यात शिरली
लाडकी शकुंतला..
भांडते मजसवे
भांड्यात जीव पडला..

आठवती दिवस ते
जीव असा गुंतला
शब्द मम एक एक
प्रिय कसा तिजला

स्मरते त्या दिवसातील
एकेक आठवांची शृखंला
राजा कित्ती कित्ती गोड
वेळावून वदतसे ती मला

तेच शब्द, वाक्य तेच
अर्थ हाय बदलला
वाकड्यात शिरते रोज
लाडकी शकुंतला..

४.

## कजाग!

आहे म्हणे तिच्या
जीभेला अशी धार
न करता विचार
चाले फारफार

कजागपणाच्या
नसती ठावे तिला सीमा
शब्द शब्द वापरून
गाठे परिसीमा

उठता बसता
शब्दांचा दांडपट्टा
पडे गपगार कोणीही
असो धट्टाकट्टा

रात्रंदिन हीस विचार
व्हावे अगाध कजाग
चालवावे जीभ अस्त्र
असो नीज अथवा जाग!

५.

## चारोळी

खाऊनिया तृप्त कोण झाला
प्रेमाची भाकर प्रेमाची चटणी
सगळेच इथे असती समान
ऐरावत इंद्राचा, शामभटाची तट्टाणी

६.

## धारवाला!

काल दारावर धारवाला आलेला
तर तू धावत कशी सुटलीस
जिभेला धार काढायला आतुर
'ठीकसे निकालो धार' पुटपुटलीस

धारवाला तसा होता अनुभवी, म्हणाला
बाईजी, चिंता बिलकुल ना करना
नुकीली बनाऊंगा जबान ऐसी
बिलकुल मत पैसा देना वरना

सभी औरतें हैं ग्राहक मेरी
बाईजी, पहले देख लेना काम
नहीं कमाता हरामकी कमाई
काम देखकरही देना फिर दाम

धारवाला गेला निघून नि म्हणालो
घरी ह्याच्या काय हालहवाल
दारोदारी फिरतो चक्रधर हा
दाखवत असेल का घरी ही कमाल?

काढत असेल का ह्याची औरत
ह्याच्या कडूनच जिभेला धार
पायावर हा पाडत असेल का धोंडा
अन पडत असेल का घरी गपगार?

# मंत्रिका

## नवस

देवा मागणे नाही फार
दे एक लाल दिव्यांची गाडी
जाता येता उठता बसता
जो तो माझी धरेल दाढी

ठोकेल जो तो वाकूनवाकून
मजला बघता उठून सलाम
संपून शाई थकून जाईल
लिहिता स्तुतिसुमनांचा कलाम

असेल वट सर्वदूर अन
साम्राज्यावरून न सूर्य मावळे
सारे काही असेल माझे
कोहळे असोत अथवा आवळे

असता खुर्ची बुडाखालती
दुनिया म्हणेल हुजूर जी
थुंकी झेलाया तत्पर सारे
मधुर शब्द ते हा जी हा जी

फार मागणे नसे देवा हे
अट्टाहास करतो ज्यासाठी
पूर्ण कर ही मामुली इच्छा
नवस बोलतो मी त्यासाठी

वाट पाहिली, आतातरी नौका
मंत्रीपदाच्या पोहोचवशी तीरावर
बनता मंत्री मग काय कमी तुज
चढवीन, सुवर्ण झुंबर तुझ्या शिरावर

# प्रेमिका

१.

**बाण!**

ज्या हृदयी रूतला बाण
त्यास न उठण्याचे त्राण
घुसेल असा काळजातूनी
आणेल कंठाशी प्राण

म्हणून गेला म्हणून गालिब
यह इश्क नहीं आसान..

२.

## प्रेमापातम

प्रेमापातम
हृदयाघातम
कुठेतरी आतम
रक्तपातम

प्रेमातुराणां
न भयं न लज्जा
सांभाळ जरा रे
नपेक्षा उडेल फज्जा
प्रेमापातम नव्हे
नुसतीच मज्जा
जमले तर ठीकच
नाहीतर नुसतीच सज्जा

# विरूपिका

१.

**जंक!**

फास्ट फूड सारखे
फास्ट झालेय लाइफ
चटपटीत चवदार चविष्ट
आणि डॉक्टर म्हणतात,
जंक फूड इज बॅड फॉर हेल्थ!

२.

## विदूषक!

त्याला म्हणे सगळे
उलटेच दिसते
गंमतच आहे..
सगळे जगच मुळात
उलटे आहे
म्हणजे तो
सुलटेच पाहतोय?

३.

## सवय

मजबूरी आहे झालं
सवय आहे ती
सुटता नाही सुटत..
समजत नाही मला
मजबूर मी आहे
की माझी ती सवय!

४.

## पाल!

न बोलावलेल्या
पाव्हण्यासारखी
आलीस तू अचानक
न टाकून बसलीस डेरा
मनात माझ्या
खरं सांगतो
ध्यानी मनी स्वप्नी
तूच दिसायचीस मला
अचानक जाणारी
इकडून तिकडे
तिकडून इकडे
कधी सुस्त
कधी झरकन्
कधी लटकत
छता नि भिंतीवर

त्यादिवशी पाहिले तुला
धडधडू लागले दिल

पटकन उघडली
कवाडे खिडकीची
तू सरकलीस..
मी झटकन मिटली तावदानं
आणि बाहेरून तू
बघत होतीस माझ्याकडे
अनिमिष नजरेने!

खरं सांगतो
आजवर माझ्याकडे
अशा नजरेने कुणी
पाहिलंच नाहीये ..

५.

## टेक्नॉलॉजी!

मी माझा फोटो दाखवला
तर
वात्रट सगळे म्हणाले,
डारयेक्ट कार्टून
कॅमेरात काढण्याइतकी
ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजी
कधी बरे झाली?

६.

## जान!

कोणी म्हणे प्रेमिक
तुम्हारे लिए हाजिर है जान..
ती अशी प्रॅक्टिकल, म्हणते
ते ठीक आहे, छान ..
पण तुझ्या त्या जान चे
घेऊन करू काय?

७.

## मांजर!

जिभल्या चाटताना काल भेटली
खात होती काही चाटूनपुसून खाऊ
म्हटले, कशी काय गं आहेस
कशी आहेस तू मनी माऊ?

ती म्हणाली, माझे काय
असतेच मजेत नेहमीच मी
लोकं असतातच ना आसपास
मला मग काय खायला कमी?

चापून खाते पिते अन
देते ढेकर वर मस्त
अन् दुपारची देते ताणून
एक ते चार, अगदीच सुस्त..

म्हणालो, हे काय खातेस
अरबट चरबट आणि जंक फूड?
मनी माऊ म्हणाली मान वेळावून
जंक? त्याचाच आहे ना आज मूड

म्हणालो, मनीमावशी ये घरी
देतो तुला बशीभर दूध अन् साय
मावशी म्हणे, दूध बिध नाही हो
ही मांजर दूधच पीत नाय..

अशी कशी गं तू वाघाची मावशी
युएसपी तुझा ना दूध पिणे
दुधाविना कशी गं जगतेस तू
हे कसले मांजरीचे जिणे?

काय ऐट नि काय तुझा तोरा
दूध करायची गट्टम चोरूनलपून
दबकत शिरायचीस खिडकीतून
नि फडताळातही लपून छपून

पावलांचाही आवाज नाही
चाटून पुसून करायची भांडी साफ
घरीदारी बायका हैराण म्हणायच्या,
मांजरीच्या जातीला नाही करणार माफ

सोडलंस ताळतंत्र अगदी काहीतरी
मार्जारपणाची ठेवायची लाज
उंदीर पण नाही खाणार म्हणशील
काही भरवसा नाही तुझा उद्या न आज

घराघरातून फिरते रोज रोज
काय दोष माझा, म्हणाली मनी माऊ
शिकलेय एक मी, देश तसा वेश,
अन जिथे जाऊ तिथे तसे राहू

मी काय करणार, जे दिसते ते शिकते
माणसाच्या जातीबरोबर राहून राहून
माणसाने सोडलंय माणूसपण तर
मी ही सोडतेय मार्जारपण पाहून पाहून..

# 'गाई'का

### हुकुमीनिद्राकार!

व्यासपीठावर कवि बभ्रूवाहन
सरसावून उभा राहिला..
महर्षी व्यासांनंतर
कवी म्हणवून घेणारा
असा तोच एक..
त्याची खात्री होती ..
कवितांचे जाडजूड बाड
हातावर सांभाळणे त्याच्या
किलचण प्रकृतीला जड जाते..
पण इतक्या छोट्याश्या गोष्टीने
नाऊमेद होईल तर
तो बभ्रू कसला?
एका हाताने बाड सावरत
दुसऱ्याने जाड भिंगाचा जड चष्मा सावरत


तो उभा राहतो..
आपल्या काव्याच्या
महासागरातील काही थेंब
तृषार्त श्रोतेवृंदाच्या कर्णसंपुटात
उतरवण्यासाठी..
दोन ओळी होतात न होतात
तोच टाळयांचा गजर..
कवितेच्या तालावर टाळयांवर टाळया
त्या गजरात त्याचे शब्द ऐकू जात नाहीत..
तो अजून जोरात कविता ओरडतो..
दीर्घ काव्याचे संक्षिप्त रूप..
टाळया पिटून लोकांचे हात दुखतात..
पिन ड्रॉप शांतता सगळीकडे..
बभ्रू अजून चेवाने वाचतोय..
श्रोतृवृंद आता अर्धोन्मीलित डोळयाने
वाट बघतोय..
दोन चार आवाज जांभयांचे
हॉलमध्ये दुमदुमतात..
त्या जीवनाच्या अथांगतळाचा शोध घेणाऱ्या
गंभीर कवितेवर
तोच एक हास्याचा शिडकावा..

बभ्रू मोकाट सुटतो.. वाचतो.. वाचतोय.. वाचत राहतोय..
श्रोत्यांच्या जांभया आता
डुलक्यांत बदलल्यात..
बभ्रू संक्षेपात संपवतो..
टाळ्यांचा कडकडाट कानात साठवत
आपल्या जागी येतो..


दुसऱ्या दिवशी कोणी एक डॉक्टर
येतो बभ्रूवाहनच्या घरी..
हुकुमी झोपेकरता वापरायचा
हुकुमी फॉर्म्युला
.. त्याच्याकडून घ्यायला..

## डॉ. नितीन मोरे यांची ३२+२ प्रकाशित पुस्तके


यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.









































राग दरबारी

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

आधुनिक कहाण्या





डॉ. नितीन मोरे
घरात

डॉ. नितीन मोरे

सांगतो ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कांनगोष्टी


अंजनईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
ई बुक
+ऑडिओपुस्तक
+व्हिडिओपुस्तक


सुलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
ढेप, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ..


Jackson!

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष
## डॉ. नितीन मोरे यांचे हे तेहतिसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही

परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१२), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (३३), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनवणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (११), अंकुश शिंगाडे(१५), आनंद देशपांडे(४), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(८), जगदिश खांदेवाले(४) पंकज कोटलवार(४) डॉ. सुरुची नाईक (३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(४) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची

आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ‘‘इ’’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।